# गौरव लोकशिक्षकाच्या स्वरसाधनेचा - वृत्तांत

**28** नोव्हेंबर **2010** रोजी स्वरसाधना संगीत कला केंद्र पुणे या विद्यालयाच्या शिष्यवर्गानी, संचालक व आदरणीय संगीत शिक्षक, गुरुवर्य पं. राम माटे यांच्या सहस्त्रचंद्रदर्शनाच्या सोहळ्यानिमित्त, त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता. विद्यावाचस्पती श्री शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. श्री अभ्यंकरांच्या व्यासंगी व्यक्तिमत्वाचा व मुग्ध करणा-या वक्तृत्वाचा याही वेळी सर्वांना अनुभव आला. या वेळी सौ. साधना माटे, पं. राम माटे यांच्या गुरुभगिनी सुनीताबाई खाडिलकर, तसेच 'अम्बर' चे संपादक व पं. माटे यांचे ज्येष्ठ शिष्य श्री सुरेश साखवळकर यांनी रंगमंचाची शोभा वाढविली. कार्यक्रमाचे आयोजन पं. माटे यांचे ज्येष्ठ शिष्य श्री श्रीकांत कुलकर्णी व श्री वसंत मराठे तसेच अमृता गोखले व त्रुप्ती नुलकर या समितीने उत्तमरित्या केले होते. श्री सुधीर कुबेर यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमाची सुरवात श्री अविराज तायडे यांच्या 'मुलतानी' ने झाली. त्यांना संवादिनी ची साथ श्री उदय शहापुरकर, तबल्याची साथ श्री अविनाश पटवर्धन व तानपु-याची साथ श्री रानडे व श्री धनंजय लोणकर यांनी केली. कार्यक्रमाची विषेशता म्हणजे रंगमंचावर श्री किशोर दातार यांची सारंगीची साथ होती. हे वाद्य ऐकू येणे आजकाल दुर्मीळ झाले आहे त्यामुळे पुण्यातील संगीत प्रेमींना ही मेजवानीच होती. श्री दातारांच्या मधुर व समर्पक सारंगी साथीने गायक कलाकारांच्या स्वरांचे रंग अधिक खुलून रसिकांसमोर आले.

या नंतर श्री देवव्रत भातखंडे यांनी 'पूरिया कल्याण' गायला. त्यांना तानपु-याची साथ श्री मंदार केळकर व श्री अतुल नेने यांनी केली. आपल्या दमदार अवाजाने व समरसून केलेल्या स्वरांच्या मांडणीने त्यांनी रसिकांची मने जिंकली. या नंतर श्री सचिन भार्गवे यांनी 'मारु बिहाग' छेडला. त्यांना तानपु-याची साथ श्री संतोश कात्रे व श्री जयदीप जोशी यांनी केली.

मग थोडा काळ सुरांना विश्रांती देत पं. राम माटे यांचा सत्कार समारंभ झाला. सुरवातीला श्री सुरेश साखवळकर यांनी सन्मानपत्र वाचले. यात पं. माटे यांच्या गुणांचा व कार्याचा गौरव व शिष्यांची कृतज्ञ भावना अधोरेखित होती. पं. माटे यांना सुवासिनींनी **81** दीपांनी ओवाळले. त्यांना श्री अभ्यंकर यांच्या हस्ते मानपत्र, पुष्पहार व थैली अर्पण केली. सुनीताबाई खाडिलकर यांनी आपल्या गुरुबंधूंविषयी अभिमान व्यक्त केला व आपल्या विर्ध्यार्थी दशेतल्या पं. माटे यांच्या बाबतच्या आठवणी सांगितल्या.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री अभ्यंकर यांनी उत्कट प्रेम व आनंद व्यक्त करीत गौरवोद्गार काढले. ते म्हणाले, "भारताला हजारो वर्षांची अभिजात संगीताची परंपरा आहे. अभिजात संगीत ही आपण जगाला दिलेली देणगी आहे. अनेक दिग्गजांनी ही संगीत ज्ञानदानाची संस्कृती जपली आहे. पं. माटे याच परंपरेतील आहेत. त्यांनी आजवर जेवढे विद्यार्थी घडविले, त्यांची संख्या पाहता, तेवढे क्वचितच कोणी घडवू शकले आहे. त्यमुळे त्यांना शिक्षक न म्हणता, 'लोकशिक्षक' म्हणले पाहिजे. स्वरसिद्धी प्राप्त करणे ही अपूर्व अशी साधना आहे. एकलक्ष्य, एकमार्ग असल्याशिवाय ही सिद्धी प्राप्त करणे अवघड आहे हे संगीताच्या विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यावे."

सत्काराला उत्तर देताना पं. माटे यांनी "उत्तम शिष्यांची केलेली जडण घडण हीच माझी मोठी पुंजी आहे. विद्यार्थ्यांनी दिलेली ही भेट चिरस्मरणात राहील." या शब्दात समाधान व्यक्त केले व अशीर्वचपर संदेश दिला. ते म्हणाले, " विद्यार्थ्यांनी प्रामणिकपणे संगीताचा रियाज करावा. इतरांशी नव्हे तर स्वत:शी स्पर्धा करावी. कालच्यापेक्षा आज रियाज चांगला कसा होईल याकडे लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांनी या गोष्टी आत्मसात केल्यास आपले जीवन कृतार्थ होईल. "

या नंतरच्या सत्रात श्री समीर दुबळे यांचे गायन झाले त्यांनी 'जोगकंस' राग गायला. त्यांना संवादिनीची साथ श्री चैतन्य कुंटे व तबला साथ श्री कौशल यांनी केली. त्यांचे लयबद्ध व प्रसन्न गायन श्रोत्यांना भावले. शेवटी पं. माटे यांचे ज्येष्ठ शिष्य श्री सुरेश साखवळकर यांचे गायन झाले. त्यांना तानपुरा साथ श्री जयदीप जोशी व श्री अतुल नेने यांनी केली, तसेच सारंगी साथ श्री किशोर दातार यांनी केली. त्यांनी 'रागेश्री' सादर केला. त्यांच्या सादरीकरणात शिस्तबद्धता व राग विस्तारात अनोखेपण विशेषत्वाने दिसले. कार्यक्रमाची सांगता त्यांनी भैरवीतील भजनाने केली.

©2010 www.atulnene.com

Share with your friends on Twitter, Facebook